जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८९९ दिनांक - २६/१२/२०२३**

सहकारनगर पोलिस स्टेशन पुणे शहर

## पेट्रोलींग करीत असताना संशयावरून पकडलेल्या आरोपीकडुन सहकारनगर पोलीसांनी केल्या चोरीच्या तीन दुचाकी जप्त

दि.२५/१२/२०२३ रोजी मा.वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी व स्टाफ असे खिसमस नाताळ सनाचे अनुशंगाने सहकारनगर पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असताना एक इसम त्याचे ताबेतील ॲक्टीव्हा मोपेड दुचाकीवर ट्रेझर पार्क कडून येवुन तावरे कॉलनीकडे वेगाने जात असलेला दिसला. त्याचा संशय आल्याने त्यास तपास पथकातील **पोलीस हवालदार भुजंग इंगळे व सुशांत फरांदे** यांनी ताब्यात घेवुन त्याची चौकशी करता त्याचे ताब्यातील दुचाकी त्याने चोरी केल्याचे निष्पन्न झाले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **सचिन शाम ढवळे वय ४३ वर्षे रा.शंकर महाराज वसाहत साई मंदिरामागे धनकवडी पुणे** असे असल्याचे सांगीतले. त्याच्याकडे सखोल चौकशी करता त्याने डुब्लीकेट चावीच्या सहाय्याने आणखी दोन दुचाकी चोरल्याची माहिती दिली. सदर इसमाने चोरी केलेल्या **४५,०००/- रू.किच्या तीन दुचाकी पैकी दोन ॲक्टीव्हा मोपेड व एक होंडा कंपनीची शाईन** अशा जप्त केल्या असुन सहकारनगर पोलीस स्टेशनकडील खालील तीन गुन्हे उघडकीस आणले आहेत.

**१) स.नगर पोलीस स्टेशन गु.र.नं.३१८/२०२३ भा.द.वि.कलम ३७९**
**२) स.नगर पोलीस स्टेशन गु.र.नं.३२९/२०२३ भा.द.वि.कलम ३७९**
**३) स.नगर पोलीस स्टेशन गु.र.नं.३४९/२०२३ भा.द.वि.कलम ३७९**

वरील प्रमाणे तीन गुन्हे उघडकीस आणुन नमुद इसमास त्यामध्ये अटक केली आहे.

सदरची कामगीरी मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग श्री.प्रवीणकुमार पाटील, मा.पोलीस उपायुक्त,परिमंडळ-२, श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग श्री.नारायण शिरगावकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सहकारनगर पोलीस स्टेशन श्री.सुरेंद्र माळाळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.संदीप देशमाने यांचे मार्गदर्शनाखाली सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक राहुल खंडाळे पोलीस अंमलदार बापु खुटवड, भुजंग इंगळे, सुशांत फरांदे, बजरंग पवार, अमोल पवार, निलेश शिवतरे, महेश मंडलिक, नवनाथ शिंदे, सागर सुतकर, सागर कुंभार, विशाल वाघ, यांनी केली आहे.